**C**

**CCE PR**
**REVISED**

ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE – 560 003**

ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಜೂನ್, 2018

**S. S. L. C. EXAMINATION, JUNE, 2018**

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 22. 06. 2018 ] ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 22. 06. 2018 ] **Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**
**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - A**<br>**( गद्य पद्यांशावर आधारीत )** | |
| I. | प्रत्येकी **एका** वाक्यातील उत्तरे ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : $16 \times 1 = 16$ | |
| 1. | चि. वि. जोशींच्या मानसपुत्रांची नांवे लिहा.<br>**उत्तर :** चिमणराव व गुंड्याभाऊ | 1 |
| 2. | काकूंचा आकांत पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांना काय वाटले ?<br>**उत्तर :** लेखकाचा द्वितीय पुत्र रघुनाथ ( राघू ) कैलासवाशी झाला | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 3. | बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ? | |
| | **उत्तर :** पोपटाला खाऊन | 1 |
| 4. | 'मेळघाटचे शिल्पकार' पाठाचे मूल्य कोणते ? | |
| | **उत्तर :** सामाजिक बांधिलकी | 1 |
| 5. | शाळेला जाऊन मुलांनी किती मार्क मिळविले ? | |
| | **उत्तर :** जेमतेम 35/40 गुण | 1 |
| 6. | टपरीपाशी उभ्या असलेल्या तरुणाच्या हातात कोणते पाकीट होते ? | |
| | **उत्तर :** गुटक्याचे पाकीट | 1 |
| 7. | सुषमा देशपांडे यानी बचत गटाच्या संकल्पनेसाठी कोणते मासिक चालविले आहे ? | |
| | **उत्तर :** मुक्ताईची पाऊलवाट | 1 |
| 8. | सावित्रीबाईंचा जन्म कोणत्या गावी झाला ? | |
| | **उत्तर :** सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील 'नायगाव' | 1 |
| 9. | भरदुपारी कुणाची रांग लागते ? | |
| | **उत्तर :** पाणी भरणाऱ्या स्त्रीयांची | 1 |
| 10. | पायांना त्या काय बांधून वाट तुडवितात ? | |
| | **उत्तर :** ओली पाने बांधून वाट तुडवितात | 1 |
| 11. | भुकेलेली पोरे कशी धावतात ? | |
| | **उत्तर :** सैरावैरा धावतात | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 12. | 'मनाचे पिंजरे' हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ? | |
| | **उत्तर :** उघड्या खिडक्या | 1 |
| 13. | शिबिरं कोणासाठी घ्यावीत असे डॉक्टरांना वाटते ? | |
| | **उत्तर :** फक्त तरुण मुलांसाठी / तरूणांसाठी | 1 |
| 14. | विरहिणी म्हणजे काय ? | |
| | **उत्तर :** देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन असणारी काव्य रचना | 1 |
| 15. | नरेंद्र कोणाच्या दरबारात कवी होते ? | |
| | **उत्तर :** रामदेवराय | 1 |
| 16. | स्त्री रान का धुंडाळते ? | |
| | **उत्तर :** घोटभर पाण्यासाठी. | 1 |
| II. | तीन-चार वाक्यात उत्तरे ( मुद्दे ) : $13 \times 2 = 26$ | |
| 17. | 'अनंतशक्तिः परमेश्वरू' या कथेचे तात्पर्य लिहा | |
| | **उत्तर :** ज्याला जी शक्ती प्रकाशली त्या शक्तीलाच तो परमेश्वर मानतो. ज्ञानी मनुष्य मात्र म्हणतो की ही परमेश्वराची एक एक शक्ती होय. पण परमेश्वर नव्हे अशा सर्व शक्तीनी युक्त असा परमेश्वर असतो. | 2 |
| 18. | दीर्घोद्योग व कष्ट करण्याने यश प्राप्त होते म्हणजे काय ? | |
| | **उत्तर :** डॉ० आंबेडकरांनी आत्मविश्वासाच्या जोरावर 8 वर्ष लागणारा अभ्यासक्रम 2 वर्ष 3 महिन्यात यशस्वीरित्या पूर्ण केला. या साठी 21 तास अभ्यास केला. चाळीशी उलटून गेली तरी 24 तासापैकी 18 तास खूर्चीवर बसून काम करीत असत. म्हणूनच दीर्घोद्योग व कष्ट करण्यानेच यश प्राप्त होत. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 19. | गंगुबाईना कोण कोणते पुरस्कार आणि उपाधीनी सन्मानित करण्यात आले ? | |
| | **उत्तर :** | |
| | **पुरस्कार** : पद्मविभूषण, पद्मभूषण, तानसेन पुरस्कार, केंद्रीय संगीत नाटक अकादमी पुरस्कार, माणिक रत्न, कर्नाटक भूषण गोदावरी पुरस्कार. | 2 |
| | **उपाधी :** सहा विद्यापिठाकडून डॉक्टरेट, संगीत सरस्वती, संगीत सम्राज्ञी, भारतीय कंठ. | |
| 20. | संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा. | |
| | **उत्तर :** | |
| | * पूर्ण नांव : ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी ( 1275 - 1296 ) | |
| | * महान कवी व तत्त्वज्ञ. मूळचे नाथ संप्रदायी | |
| | * कार्य : भागवत संप्रदायाची ( वारकरी संप्रदाय ) स्थापना. 18 व्या वर्षा भगवद्गीतेवरील टीका 'ज्ञानेश्वरी' लिहली. 21 व्या वर्षी आळंदी येथे संजीवन समाधी. | 2 |
| | * ग्रंथरचना : अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, अभंग, पदे स्फुट रचना. | |
| 21. | 'विडंबन' म्हणजे काय ? पाहुणे ही कविता कोणत्या कवितेचे विडंबन आहे ? | |
| | **उत्तर :** | |
| | * विडंबन म्हणजे उपहासात्मक विपर्यास केला जातो आणि हसत हसत दोष दिग्दर्शन केले जाते. | 1 |
| | * 'पाहुणे' हे विडंबन केशवसुतांच्या 'दंवाचे थेंब' या कवितेचे आहे. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 22. | ''गाई पांगता जीवाची रागामुळं व्हई आग.'' संदर्भासह स्पष्टीकरण करा. | |
| | **उत्तर :** | |
| | **संदर्भ** : | |
| | कवितेचे नांव : नेनंता गुराखी | |
| | कवी : इंद्रजित भालेराव | 1 |
| | निवड : आम्ही काबडाचे धनी | |
| | **स्पष्टीकरण :** नेनंता गुराखी गुरे राखण्यासाठी रानात जातो. खंडीभर गुरामागे धावतो. जेव्हा गुरे जिकडे तिकडे धावतात तेव्हा त्याना एकत्रित आणताना राग येतो व जीवाची आग होते. | 1 |
| 23. | ''मजला तोफेच्या तोंडी बांधून माझे डाके तरी किल्ल्यात पाडावे.'' संदर्भासह अर्थ स्पष्टीकरण करा. | |
| | **उत्तर :** | |
| | **संदर्भ** : | |
| | पाठाचे नांव : वसईचा वेढा | |
| | लेखक : कृष्णाजी विनायक सोहनी | 1 |
| | आप्पासाहेबांनी आपल्या सरदारांना बोलावून म्हटले. | |
| | **स्पष्टीकरण :** चिमाजी अप्पांचा किल्ला जिंकण्याचा निश्चय मोठा होता. तीन वर्ष लढाई करुन सुद्धा किल्ला हस्तगत होत नव्हता म्हणून सर्व सरदारांना जमा करून अप्पासाहेब वरील वाक्य म्हणतात. | 1 |
| 24. | विद्या कशाप्रमाणे आहे ? माणूस विद्येचा पुजारी केव्हा होईल ? | |
| | **उत्तर :** | |
| | * विद्या महासागराप्रमाणे आहे. | 1 |
| | * जो मनुष्य पुस्तकावर प्रेम करील तेव्हाच विद्येचा पुजारी होईल. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 25. | रा. रं. बोराडे याचा परिचय लिहा. | |
| | **उत्तर :** | |
| | **पूर्ण नांव** : रावसाहेब रंगराव बोराडे. ग्रामीण कथाकार ग्रामोण जीवनातोल उणिवा तेथील दारिद्रय याबद्दल त्यांना वाटणारी खंत ठिकठिकाणी जाणवते. ग्रामीण भाषेतील रांगडेपणा व गोडवा आढळतो. | 1 |
| | **साहित्य :** माळरान, बोळवण, मळणी कथासंग्रह 'मळणी' ला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळालेला आहे. | 1 |
| 26. | फुल्यांना कशाचा झटका आला ? झटका आल्यावरही त्यांनी कोणत पुस्तक लिहले ? | |
| | **उत्तर :** | |
| | * फुल्यांना पक्षाघाताचा झटका आला. | 1 |
| | * झटका आल्यावरही त्यांनी त्याच अवस्थेत डाव्या हाताने लिहून अर्धे राहिलेले 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक लिहून पूर्ण केले. | 1 |
| 27. | पाहुण्यांच्या वर्तनाने आई कंटाळून का गेली ? | |
| | **उत्तर :** पाहुणे आगाउ सूचना न देता येतात. फराळाच्या डव्यावर राजरोस हल्ला करतात. बाबांच्या पेटयातून विड्याचे जुडगे पळवतात. निर्लज्जपणे वागतात, कित्येक दिवस ठाण मांडून बसतात जायचे नाव काढत नाहीत. | 2 |
| 28. | तिच्या संसाराला वणवा का म्हटले आहे ? | |
| | **उत्तर :** कष्टकरी स्त्रिया अपार कष्ट करून संसारगाडा सांभाळतात. त्यांच्या वाटयाला दुःखच येते. स्वतःचे दुःख लपवून ठेवून तांब्याभर पाण्याच्या विसाव्याची अपेक्षा करतात. या दुःखात सुख शोधण्यासाठी आपल्याला कोणीतरी बंधूभगिनी पाठी असावं, मूलबाळ असावं असे वाटते. पायानां पानं बाधून वाट तुडवते. तिचा संसार म्हणजे कधीही न विझणारा वणवा आहे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| 29. | विठ्ठलाला कोणती विनवणी केली आहे ?<br>**उत्तर :** भूक हे जगातले एकमेव सत्य आहे. त्यासाठी माणूस वाट्टेल ते करण्यास तयार होतो. भुक्या पोटी विठ्ठलाचे नामस्मरण होत नाही. तू मायाळू आहेस तर आमची भूक का शमवत नाहीस ? एकतर तू आमची भूक शमवावी आणि आपले देवपण सिद्ध करावे. नाहीतर माथ्यावर पडलेले घणाचे घाव निमूटपणे सोसण्यास तयार व्हावे अशी विनवणी केली आहे. | 2 |
| III. | पाच-सहा वाक्यात उत्तरे ( उत्तराचे मुद्दे ) : $10 \times 3 = 30$ | |
| 30. | लढाईतील जखमी लोकांसाठी व इतरांसाठी श्रीमंतानी काय केले ?<br>**उत्तर :**<br>वसईच्या लढाईत अनेक लोक जखमी झाले. त्यातील काही लोकांना पालख्या दिल्या. तर काही जणांना गाव इनाम दिले. | 1 |
| | **बालपरवेशी :** लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांच्या संगोपनासाठी दिलेला बैठा पगार, जमीन इ. | 1 |
| | **नानापरवेशी :** लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या संततीहीन पत्नीस तिच्या निर्वाहापुरता दिलेला पगार, जमीन इ. | 1 |
| 31. | ''कोपऱ्यातील छत्री घेऊ नका'' असे दुकानदार लेखकाना का म्हणाला ?<br>**उत्तर :** लेखकाने जुन्या बाजारात जाऊन बारा रुपयाची छत्री विकत घेतलेली पाहून दुकानदारास आश्चर्य वाटले. तेव्हा दुकानदार लेखकास म्हणाला — ''ती छत्री घेऊ नका. संबंध पाणी अंगावर येईल बघा.'' तरीही लेखकाने ती छत्री विकत घेतली. | 3 |
| 32. | दोघे भाऊ का भांडत असत ? वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ?<br>**उत्तर :** संपत्तीची वाटणी करण्याच्या कारणावरुन दोघे भाऊ भांडत असत. | 1 |
| | वाटणीचा घोळ सहा महिन्यापासून घरात चालू होता. घरातल्या कटकटी अधिकच वाढत होत्या. कधी शेतातली कामं खोळबून राहत होती. तर कधी चूल बंद पडत होती. आठ दिवसापासून घरातील धूसपूस वाढली होती. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 33. | अण्णा वारल्यानंतर आईचे जगच खलास झाले होते म्हणजे काय ?<br>**उत्तर :** अण्णा वारल्यावर आईचे जगच बदलून गेले. ती कधीकधी उद्वीग्न हाऊन म्हणायची. ''नवरा गेल्यावर काय दुःख होतं ते त्या रांडमुंड बाईलाच माहीत.'' भांडण झाली तर तिला नवऱ्याची आठवण येई. ''वाघासारखा माझा नवरा गेला म्हणून तुमच बोलणं खाण्याची वेळ माझ्यावर आली.'' अशा शब्दात आपल्या नवऱ्याविषयी प्रेम व्यक्त करायची. | 3 |
| 34. | रुक्मिणीच्या गुरुचे नाव काय ? श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय काय प्रयत्न केले आहेत ?<br>**उत्तर :** रुक्मिणीच्या गुरुचे नांव सुदेव होय.<br>श्रीकृष्णाचे वर्णन ऐकल्यापासून त्याच्या प्राप्तोसाठी अनेक वर्ष व्रते केली. नियम धरले. देव गुरु आणि ब्राह्मणाची सतत पूजा केली. दारी आलेल्या कोणाही याचकास परत पाठविले नाही. | 1<br>2 |
| 35. | ''जरा तरी समज धरी अंतरी.'' असे कवी का म्हणत आहे ?<br>**उत्तर :** मानव जन्म हा एकदाच मिळतो, त्या जन्माचे सार्थक करून घे. आपल्याला तारणारा परमेश्वरच आहे. त्याचे सतत स्मरण कर. कठीण साधना करणे, अंगावर भस्म ओढणे, जटा वाढवणे, या सर्वात वेळ दवडू नकोस. मठाची उठाठेव करू नकोस हा समज तू तुझ्या मनी धर. | 3 |
| 36. | धरण बांधणाऱ्या स्त्रीची व्यथा तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** धरण बांधताना जणू ती आपले मरण कांडत आहे. पहाटे उठते तर जात्यात पीठ नसत. कणी कोंडा रांधून खाते. व कामास जाते. दुपारच्या वेळी तिचा जीव मागे घुटमळतो. कारण तान्हुल बाळ ती बुट्टी खाली झापून आलेली आहे. उन्हाने तिचे पाय पोळत आहेत तिने ओली पाने पायाला बांधली आहेत. घोटभर पाण्यासाठी रानोमाळ फिरत आहे. मालकाची भरभराट झाली आहे पण तिच्या अंगणात मात्र पालापाचोळा पडलेला आहे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 37. | तारे, सुधांशू, शुक्र यांनी पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोणते प्रयत्न केले आहेत ?<br>**उत्तर :**<br>**तारे :** दिमाखात नट्न थटून पृथ्वीवर उल्कारूपी फुले उधळतात.<br>**सुधांशू :** सुर्याचे किरण घेऊन तप करून मोहवायचा प्रयत्न करतो.<br>**शुक्र :** पहाटेचा पिसारा फुलवून प्रेमळपणे याचना करत आहे. | <br><br>1<br>1<br>1 |
| 38. | बेळगांव काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.<br>**उत्तर :** 1924 मध्ये महात्मा गांधीजींच्या अध्यक्षतेखाली बेळगांवी काँग्रेस अधिवेशन. या कार्यक्रमाचे स्वागतगीत गंगूबाई आणि विद्यार्थीनीनी गाईले. व्यासपीठावर गांधीजी, नेहरू, महम्मद अली जीना, गंगाधर देशपांडे अशी बडी बडी मंडळी बसलेली होती. गांधीजीनी गंगूबाईनी शाबासकी दिली, जातीवरुन आपला अपमान होईल असे भय होते. पण त्यांना सगळ्याबरोबर जेवणाच्या पंक्तीला घाबरुन खाली बसल्या पण त्यांचा कोणी पानऊतारा केला नाही पंक्तीतून उठवले नाही. ही घटना दीर्घकाळ स्मरणात आनंद देत राहिली. | 3 |
| 39. | गुराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतो ?<br>**उत्तर :** लहानपणी चिखलाची गाई गुरे बनवून खेळणाऱ्या कवींचे बालपण बघता बघता संपले आणि बैलामागे रानात जनावरांना चारण्यास जावे लागले. गुरांना पांगताना त्याचा जीव वेठीस येई. सदासर्वदा गोठ्यामध्ये गायीना तो सांभाळतो. गाईच्या कळपात राहून सुद्धा त्याला दूध मिळत नाहो. आई त्याला कोठून तरी उसनं दूध घेऊन देते. ते ही मिळत नाही, तेव्हा कवीला वाटते की गुराखी कृष्ण झाला नाही. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IV. | आठ - दहा वाक्यात उत्तरे लिहा ( उत्तराचे मुद्दे ) : $5 \times 4 = 20$ | |
| 40. | 'मदर्स युनियन' संस्थेची माहिती लिहा.<br>**उत्तर :**<br>**स्त्रीयांच्या विकासासाठी संघटना :**<br>1) मदर्स युनियन<br>2) हाऊस व्हाईव्हज युनियन. | |
| | * **मदर्स युनियन –** या संस्थेची स्थापना 1945 साली | 1 |
| | * तीन मजली इमारत, पहिला मजला मदर्स युनियन, दुसरा मजला पालक संस्था, तिसरा मजला शिक्षक संघटना ऑफीस. | $1\frac{1}{2}$ |
| | * हिरोशिमावर बॉब हल्ला झाला तेव्हा अनेक घरे जमीनदोस्त झाली. कित्येक संसार धुळीला मिळाले. देशातील तरुण पुरुषांची संख्या कमी झाली. आई-बापाविना मुले पोरकी झाली. दीनवाणी मुलं दारोदार हिंडू लागली. याना आश्रय देण्यासाठी स्थापना झाली. | $1\frac{1}{2}$ |
| 41. | लेखकाच्या अंगणात कोणकोणती झाडे आहेत ? चाफ्याच्या झाडाला लेखक 'बडी माँ' का म्हणतात ? त्याची गंमत कोणती ? | |
| | **उत्तर :** लेखकाच्या अंगणात गुलमोहोर, राखीने दिलेले झाड, मोसंबी, पांढरा चाफा, पपया, बहावा लाल, चिनार, बदाम, इत्यादी. | 1 |
| | चाफ्याचे झाडाची कुठलीही फांदी किंवा पाने तोडलं की तिथून दुधासारखा पांढरा चीक निघतो. म्हणून त्याला 'बडी माँ' असे नाव दिलंय. | $1\frac{1}{2}$ |
| | या झाडाची गंमत म्हणजे फुलं आली को पाने गायब ! आणि पानं येतात तेव्हा फुलांचा पत्ता नसतो. तो पानाफुलांचा लपंडाव पाहताना खूप मजा येते. वाटते बडीमाँच्या अंगाखांद्यावर त्या पानाफुलांचे बागडणं चालू असते. | $1\frac{1}{2}$ |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | कवीने कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय याचे दाखले का दिले आहेत ? ते स्पष्ट करा.<br>**उत्तर :**<br>**कृष्ण :** युद्धात गोंधळलेल्या अर्जुनाला युद्धास प्रवृत्त केले. भरकटलेल्या समाजासाठी हेच कार्य समाजसेवकानी केले. | 1 |
| | **कर्ण :** कर्ण स्वाभीमानी होता. आपणही कुंतीपुत्र आहोत हे समजल्यावरही त्याने आपले वचन पाळले. कर्णाचे रथाचे चक्र भूमीत फसले तरी शौर्याने परिस्थितीवर मात तसे कठीण परिस्थीतीत सामना करणारे समाजसेवक. | 1 |
| | **सौभद्र :** अर्जुन अन्यत्र युद्धात गुंतला असताना स्वजनासाठी चक्रव्यूह भेदून प्राण दिला. बलीदान देणारे समाजसेवक. | 1 |
| | **मार्कंडेय :** अल्पायुषो होता. शिवभक्त होता. शंकराने यमाशी युद्ध केले. दीर्घायुषी झाला. मृत्यूवर मात करणारे समाजसेवक. | 1 |
| 43. | 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** पृथ्वीचा पोटातून ज्वालारस बाहेर पडला. पृथ्वीचा नाश झाला. पृथ्वी ओस पडलो. नद्यानी विश्वसंहार झाला म्हटले. अनेक वर्ष पृथ्वीने तप केले व एक बीज अंकुरले त्यातून हिरवे पात बाहेर पडले. या पात्याचा सत्कार सोहळा मांडला आहे. जणू मातीने मृत्यूवर मात केली. हा पृथ्वीच्या श्रद्धेचा अंकुर आहे. हाच सृजनत्त्वाचा विजय व जीवनसाक्षात्कार आहे. | 2 |
| | या सत्कार सोहळ्यासाठी पक्षानी स्वागतगीत म्हटले आहे. ढगांनी वाकून मुजरा केला. मातीरूपी लाल गुलाल उधळत पवन संचार करत आहे. पावसाची सर दक्षिण-उत्तर कोसळली आहे. मातोचा सुगंध सर्वत्र दखळला. अष्टदिशांनी शुभेच्छा देऊन जयजयकार केला आहे. | 2 |
| 44. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा – 4<br>जातीभाव विसरूनिया ..............................................<br>.......................................................................<br>.......................................................................<br>..................................................... भीती बावरी. | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **उत्तर :**<br>जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही<br>अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातून<br>खलनिंदका मनीही सत्य, न्याय वसू दे, देवरचि असा दे<br>सादर्य रमो घराघरात स्वर्गियापरी<br>हो नष्ट होऊ दे, विपत्ती भीती बावरी. | 4 |
| | **विभाग - B**<br>**( व्याकरणावर आधारीत )** | |
| V.<br>45. | योग्य पर्यायी उत्तरे : ( बरोबर उत्तरास **एक** मार्क द्या ) : $10 \times 1 = 10$<br>''सदाचार'' ही संधी अशी सोडवितात<br>(अ) सदा + चार (ब) सद् + आचार<br>(क) सत् + आचार (ड) स + दाचार.<br>**उत्तर :** (क) सत् + आचार | 1 |
| 46. | 'त, ई, आ' हे कोणत्या विभक्तीचे प्रत्यय आहेत ?<br>(अ) प्रथमा (ब) द्वितीया<br>(क) पंचमी (ड) सप्तमी.<br>**उत्तर :** (ड) सप्तमी | 1 |
| 47. | 'मनस्वी गाणे गाते.' या वाक्यात प्रयोग कोणता आहे ?<br>(अ) कर्मणी (ब) भावे<br>(क) कर्तरी (ड) यापैकी नाही.<br>**उत्तर :** (क) कर्तरी | 1 |
| 48. | 'वरदने चित्र काढले.' या वाक्यात कोणता काळ आहे ?<br>(अ) भविष्य काळ (ब) भूत काळ<br>(क) वर्तमान काळ (ड) पूर्ण भूतकाळ.<br>**उत्तर :** (ब) भूत काळ | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 49. | इकडे आड तिकडे ...................... ही म्हण पूर्ण करण्यासाठी हा शब्द वापरावा.<br>(अ) झाड (ब) नदी<br>(क) विहीर (ड) सरोवर.<br>**उत्तर :** (क) विहीर | 1 |
| 50. | 'वा! किती सुंदर अक्षर आहे.' हे या प्रकारचे वाक्य आहे<br>(अ) आज्ञार्थी (ब) प्रश्नार्थी<br>(क) उद्‌गारवाचक (ड) केवलवाक्य.<br>**उत्तर :** (क) उद्‌गारवाचक | 1 |
| 51. | 'अनंतशक्ती' हा या प्रकारचा समास आहे<br>(अ) कर्मधारय (ब) अव्ययीभाव<br>(क) बहुव्रीही (ड) द्विगू.<br>**उत्तर :** (अ) कर्मधारय | 1 |
| 52. | 'रणांगणावर आलेले मरण' याला एक शब्द<br>(अ) आहुती (ब) शहीद<br>(क) मृत्यू (ड) वीरमरण.<br>**उत्तर :** (ड) वीरमरण | 1 |
| 53. | 'सिद्धी भरभर चालते' या वाक्यातील 'भरभर' या शब्दाची जात ही आहे<br>(अ) क्रियापद (ब) विशेषण<br>(क) क्रिया विशेषण (ड) नाम.<br>**उत्तर :** (क) क्रिया विशेषण | 1 |
| 54. | 'सांडणी' याचे पुल्लींग रूप हे आहे<br>(अ) सांडणी (ब) उंट<br>(क) कुत्रा (ड) मांडणे.<br>**उत्तर :** (ब) उंट | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VI. | तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द ( बरोबर उत्तरास **एक** मार्क द्या ) : $4 \times 1 = 4$ | |
| 55. | ज्ञान : अज्ञान : : प्रेम : .............<br>**उत्तर :** द्वेष | 1 |
| 56. | ! : उद्‌गारवाचक : : ? : .............<br>**उत्तर :** प्रश्नार्थी | 1 |
| 57. | तोय : जल : : सदन : .............<br>**उत्तर :** घर, निवास, आलय, भुवन | 1 |
| 58. | बटाटा : पोर्तुगीज : : अडकित्ता : .............<br>**उत्तर :** कानडी | 1 |
| VII. | सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे ( मद्दे ) : $3 \times 2 = 6$ | |
| 59. | 'हटा तटाने पटा रंगवुनि जटा धरिशी का शिरी.'<br>अलंकार ओळखून लक्षणे लिहा.<br>**उत्तर :** अलंकार → अनुप्रास अलंकार<br>व्याख्या ( लक्षणे ) → एकाच वर्णाची पुनरावृत्ती होऊन शब्दचमत्कृती साधली जाते. तथे अनुप्रास अलंकार होता. या ओळीत 'ट' या अक्षराची पुनरावृत्ती झाली आहे. | 1<br>1 |
| 60. | 'युगामागुनी चालली रे युगे ही करावी किती भास्करा वंचना.'<br>या ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.<br>**उत्तर :**<br>युगामा / गुनी चा / लली रे / युगे ही / करावी<br>U – – / U – – / U – – / U – – / U – –<br>य य य य य<br>किती भा / स्करा वं / चना<br>U – – / U – – / U –<br>य य ल ग<br>वृत्ताचे नाव : सुमंदारमाला<br>एकूण अक्षरे : 23<br>गण : य, य, य, य, य, य, य, ल, ग.<br>यति : 5, 11, 17 व्या अक्षरावर. | 1<br>1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 61. | पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :<br>(i) कैलासवासी होणे<br>(ii) शिळ्या कढीला ऊत येणे.<br>**उत्तर :**<br>वाक् प्रचारांचा अर्थ<br>अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ मार्क<br>वाक्यात उपयोग करणे $\frac{1}{2}$ मार्क<br>(i) मृत्यू होणे<br>(ii) गतकाळातील गोष्टी उकरुन काढणे<br>( वाक्यात वाक्प्रचाराचा उपयोग व्हावा / अर्थाचा नव्हे ) | 1<br><br>1 |
| | **विभाग - C**<br>**( लेखन व रचनेवर आधारीत लेखन )** | |
| VIII. 62. | खालीलपैको **एका** कल्पनेचा विस्तार करा : $1 \times 3 = 3$<br>(i) मरावे परी किर्तीरूपे उरावे.<br>(ii) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.<br>कल्पना विस्तार ( उत्तराचे मुद्दे ) :<br>**उत्तर :**<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे ( शब्दशः अर्थ ) 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |
| IX. 63. | आरोग्याचे महत्व सांगणारे पत्र तुमच्या भावाला / बहिणीला लिहा. $1 \times 5 = 5$<br>**किंवा**<br>तुम्ही दहावी पास झाला आहात. पुढील शिक्षणासाठी शाळा सोडल्याचा दाखला मागण्यासाठी तुमच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा. | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | | गुण |
|---|---|---|---|
| | **उत्तर :** | | |
| | i) प्रेषक पत्ता ( पाठविणाऱ्याचा ) | 1 | |
| | ii) मायना | 1 | |
| | iii) विषय मांडणी व भाषा सजावट | 2 | 5 |
| | iv) शेवटो सही | $\frac{1}{2}$ | |
| | v) कोणाला पाठवायचे त्याचा पत्ता | $\frac{1}{2}$ | |
| | अर्ज लेखन मुद्द : | | |
| | **उत्तर :** | | |
| | i) प्रेषक पत्ता | 1 | |
| | ii) मायना ( योग्य अधिकाऱ्याला ) | 1 | |
| | iii) विषय | 1 | |
| | iv) मजकूर | 1 | |
| | v) शेवटी सही | $\frac{1}{2}$ | |
| | vi) कोणाला पाठवायचे त्याचा पत्ता | $\frac{1}{2}$ | |
| X. 64. | खालीलपैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा : | 1 × 5 = 5 | |
| | (i) इंटरनेट काळाची गरज | | |
| | (ii) भारतातील शेतकऱ्याची समस्या | | |
| | (iii) राष्ट्रीय सण. | | |
| | **उत्तर :** | | |
| | i) आकर्षक सुरुवात | 1 | |
| | ii) विषय ज्ञान | 2 | |
| | iii) भाषा सजावट ( अलंकार वगैरेचा वापर ) | 1 | 5 |
| | iv) शेवट. | 1 | |